महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

# महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या [आकस्मिक खर्च] नियम, १९६८

(दिनांक ३१ ऑक्टोबर १९९१ पर्यंत सुधारित)

संचालक, सरकारी मुद्रण व लेखन सामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४, यांच्याद्वारे प्रकाशित आणि
व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर, यांच्याद्वारे भारतात मुद्रित
१९९१

[किंमत रु. १.००]

Page from 1 to 6

Attested.

गटविकास अधिकारी (उच्च श्रेणी)
पंचायत समिती, [illegible]

# महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (आकस्मिक खर्च) नियम, १९६८.

(एक) शासकीय अधिसूचना, ग्राम विकास विभाग क्र. झेडपीए-१०६८-१८४६-७०-डी-तीन, दिनांक २५ फेब्रुवारी १९७०, आणि

(दोन) शासकीय अधिसूचना, ग्राम विकास विभाग क्र. जेईपी-११७१-१०२६७-डी-एक, दिनांक २० सप्टेंबर १९७२, या अन्वये सुधारणा करण्यात आलेली शासकीय अधिसूचना, ग्राम विकास विभाग क्र. झेडपीए-१०६३-४५२८६-डी-तीन, दिनांक २८ फेब्रुवारी १९६८.

१. **संक्षिप्त नाव** :—या नियमांना "महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (आकस्मिक खर्च) नियम, १९६८" असे म्हणावे.

२. जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांनी जीप आणि ॲम्बॅसेडर मोटारी यांचे परिरक्षण व दुरुस्ती यांवरील खर्चाव्यतिरिक्त आकस्मिक खर्चासाठी केलेल्या तरतुदींमधून खर्च करण्यास सक्षम असणारे प्राधिकारी.—

(१) या सोबतच्या अनुसूची 'अ' च्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले प्राधिकारी हे, ज्यांना उक्त अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये त्यांच्यापैकी प्रत्येकासमोर विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या विषयाच्या संबंधातील आकस्मिक खर्चासाठी जिल्हा परिषदेने तिच्या अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीमधून प्रत्येक प्राधिकाऱ्यासाठी नेमून दिलेल्या रकमेतून उक्त अनुसूचीच्या स्तंभ (४) व (५) यामध्ये करण्यात आलेल्या मर्यादेपर्यंत खर्च करता येईल असे प्राधिकारी असतील.

(२) या सोबतच्या अनुसूची 'ब' च्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले प्राधिकारी, हे ज्यांना उक्त अनुसूचीच्या स्तंभ (४) व (५) यामध्ये त्यांच्यापैकी प्रत्येकासमोर विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या विषयांच्या संबंधातील आकस्मिक खर्चासाठी पंचायत समितीने तिच्या गट अनुदानांच्या अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीमध्ये प्रत्येक प्राधिकाऱ्यासाठी नेमून दिलेल्या रकमेतून खर्च करता येईल असे प्राधिकारी असतील.

(३) उक्त अनुसूची 'अ' व अनुसूची 'ब' यांच्या स्तंभ (२) मध्ये नमूद करण्यात आलेल्या कोणत्याही प्राधिकाऱ्याला जिल्हा परिषदेवर किंवा पंचायत समितीवर परिणाम करणाऱ्या समस्यांवर चर्चा करण्यासाठी भरविण्यात आलेल्या बैठकींमध्ये किंवा परिषदांमध्ये चहा, कॉफी, शीतपेये व अल्पोपहार यावरील खर्च करण्यासाठी, जिल्हा परिषदेच्या किंवा यथास्थिती, पंचायत समितीच्या अर्थसंकल्पात त्याला नेमून दिलेल्या आकस्मिक खर्चाच्या अनुदानामधून खर्च करता येईल.

३. **जीप व ॲम्बॅसेडर मोटारी यांचे परिरक्षण आणि दुरुस्ती यावरील खर्च करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी.**—या सोबतच्या अनुसूची 'क' च्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले प्राधिकारी हे, ज्यांना उक्त अनुसूचीच्या स्तंभ (४) आणि (५) यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मर्यादेपर्यंत, स्तंभ (३) मध्ये त्यांच्यापैकी प्रत्येकासमोर विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या विषयाच्या संबंधात जिल्हा परिषदेने तिच्या अर्थसंकल्पात आकस्मिक खर्चासाठी केलेल्या तरतुदीमधून प्रत्येक प्राधिकाऱ्यासाठी नेमून दिलेल्या रकमेतून केवळ आवर्ती स्वरूपाचा खर्च करता येईल असे प्राधिकारी असतील.

## अनुसूची 'अ'

[नियम २ (१) व (३) पहा]

| अ. क्र. | प्राधिकारी | विषय | अधिकाराची मर्यादा | |
|---|---|---|---|---|
| | | | आवर्ती | अनावर्ती |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | गट विकास अधिकारी | जिल्हा यादीमध्ये नमूद करण्यात आलेले विषय. | रु. ५,००० पेक्षा अधिक नाही. | रु. १०,००० पेक्षा अधिक नाही. |
| २ | उप-मुख्य कार्यकारी अधिकारी. | जिल्हा यादीमध्ये नमूद करण्यात आलेले विषय. | रु. १०,००० पेक्षा अधिक नाही. | रु. १५,००० पेक्षा अधिक नाही. |
| ३ | जिल्हा परिषदेचा विभाग प्रमुख. | जिल्हा यादीमध्ये नमूद करण्यात आलेले विषय. | रु. १०,००० पेक्षा अधिक नाही. | रु. १५,००० पेक्षा अधिक नाही. |
| ४ | मुख्य कार्यकारी अधिकारी | जिल्हा यादीमध्ये नमूद करण्यात आलेले विषय. | रु. १०,००० पेक्षा अधिक परंतु रु. २०,००० पेक्षा अधिक नाही. | रु. १५,००० पेक्षा अधिक परंतु रु. ३०,००० पेक्षा अधिक नाही. |
| ५ | विषय समितीचा अध्यक्ष | अशा समितीकडे नेमून दिलेले विषय. | रु. २०,००० पेक्षा अधिक परंतु रु. ३०,००० पेक्षा अधिक नाही. | रु. ३०,००० पेक्षा अधिक परंतु रु. ४०,००० पेक्षा अधिक नाही. |
| ६ | स्थायी समितीचा अध्यक्ष | जिल्हा यादीमध्ये नमूद करण्यात आलेले विषय. | रु. ३०,००० पेक्षा अधिक परंतु रु. ४०,००० पेक्षा अधिक नाही. | रु. ४०,००० पेक्षा अधिक परंतु रु. ५०,००० पेक्षा अधिक नाही. |
| ७ | विषय समिती | अशा समितीकडे नेमून दिलेले विषय. | रु. ४०,००० पेक्षा अधिक परंतु रु. ५०,००० पेक्षा अधिक नाही. | रु. ५०,००० पेक्षा अधिक परंतु रु. ६०,००० पेक्षा अधिक नाही. |
| ८ | स्थायी समिती | जिल्हा यादीमध्ये नमूद करण्यात आलेले विषय. | रु. ५०,००० पेक्षा अधिक परंतु रु. ६०,००० पेक्षा अधिक नाही. | रु. ६०,००० पेक्षा अधिक परंतु रु. ७०,००० पेक्षा अधिक नाही. |

## अनुसूची 'ब'

[नियम २ (२) व (३) पहा]

| अनु-क्रमांक | प्राधिकारी | विषय | अधिकाराची मर्यादा | |
|---|---|---|---|---|
| | | | आवर्ती | अनावर्ती |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | गट विकास अधिकारी. | अधिनियमाच्या दुसऱ्या अनुसूचीत नमूद करण्यात आलेले विषय | रु. १,००० पेक्षा अधिक नाही. | रु. ५,००० पेक्षा अधिक नाही. |
| २ | अध्यक्ष, पंचायत समिती. | अधिनियमाच्या दुसऱ्या अनुसूचीत नमूद करण्यात आलेले विषय. | रु. १००० पेक्षा अधिक परंतु रु. १०,००० पेक्षा अधिक नाही. | रु. ५,००० पेक्षा अधिक परंतु रु. ३०,००० पेक्षा अधिक नाही. |
| ३ | पंचायत समिती. | अधिनियमाच्या दुसऱ्या अनुसूचीत नमूद करण्यात आलेले विषय. | रु. १०,००० पेक्षा अधिक. | रु. ३०,००० पेक्षा अधिक. |

## अनुसूची 'क'

[नियम ३ पहा]

| प्राधिकारी | विषय | अधिकाराची मर्यादा | इतर शर्ती |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | जीप व ॲम्बॅसेडर मोटारी यांचे परिरक्षण म्हणजेच पेट्रोल, तेल व संधारण आकार यावरील खर्च | | |
| (एक) गट विकास अधिकारी. | (अ) ब्लॉक जीपसाठी | प्रत्येक जीपसाठी दरमहा रु. ४५० पर्यंत. | .. |
| (दोन) मुख्य कार्यकारी अधिकारी. | वरीलप्रमाणे | प्रत्येक जीपसाठी दरमहा रु. ४५० पेक्षा अधिक | अशी मंजूरी देण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने गट विकास अधिकाऱ्याकडून जादा खर्चासाठी देण्यात आलेल्या विशेष कारणांची स्वत: खात्री करुन घेतली पाहिजे. |
| (तीन) मुख्य कार्यकारी अधिकारी, किंवा त्याच्याकडून याबाबतीत प्राधिकृत करण्यात येईल जिल्हा परिषदेच्या इतर प्राधिकारी. | (ब) जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखाच्या जीप व ॲम्बॅसेडर मोटारी धरुन परंतु जीप व ॲम्बॅसेडर मोटारी यांच्या जिल्हा संकोषातील (डिस्ट्रीक्ट पूल) नसतील अशा युनिसेफ जीप आणि विनिर्दिष्ट कामासाठी आणि योजनांसाठी असतील अशा जीप व ॲम्बॅसेडर मोटारी वगळून जिल्हा परिषदेच्या जीप व ॲम्बॅसेडर मोटारीसाठी. | प्रत्येक जीपसाठी दरमहा रु. ४५० पर्यंत. | .. |
| (चार) स्थायी समिती. | वरीलप्रमाणे | प्रत्येक जीपसाठी दरमहा रु. ४५० पेक्षा अधिक. | अशी मंजुरी देण्यापूर्वी स्थायी समितीने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडून किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या जिल्हा परिषदेच्या अशा इतर प्राधिकाऱ्यांकडून जादा खर्चासाठी देण्यात आलेली विशेष कारणे विचारात घेतली पाहिजेत. |

**अनुसूची 'क'-चालू**

(नियम ३ पहा)

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| **टयुब्ज आणि टायर्स धरून, जीप आणि ॲम्बॅसेडर मोटारी यांच्या सुट्या भागाची दुरुस्ती वर ते बदलणे आणि त्यांचे नविनीकरण** | | | |
| (एक) गट विकास अधिकारी. | (अ) ब्लॉक जीपसाठी | प्रत्येक जीपसाठी दरवर्षी रु. १, ५०० पर्यंत | .. |
| (दोन) मुख्य कार्यकारी अधिकारी. | वरीलप्रमाणे | प्रत्येक जीपसाठी दरवर्षी रु. १, ५०० पेक्षा अधिक परंतु रु. ३, ००० पेक्षा अधिक नाही. | .. |
| (तीन) स्थायी समिती. | वरीलप्रमाणे | प्रत्येक जीपसाठी दरवर्षी रु. ३, ००० पेक्षा अधिक परंतु रु. ७,५०० पेक्षा अधिक नाही. | .. |
| (चार) मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा त्याच्याकडून याबाबतीत प्राधिकृत करण्यात येईल असा जिल्हा परिषदेचा इतर अधिकारी. | (ब) जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखाच्या जीप आणि ॲम्बॅसेडर मोटारी धरून परंतु जीप व ॲम्बॅसेडर मोटारी यांच्या जिल्हा संकोषातील (डिस्ट्रीक्ट पूल) नसतील अशा युनिसेफ जीप आणि विनिर्दिष्ट कामासाठी आणि योजनांसाठी असतील अशा जीप आणि ॲम्बॅसेडर मोटारी वगळून जिल्हा परिषदेच्या जीप आणि ॲम्बॅसेडर मोटारीसाठी. | प्रत्येक जीपसाठी दरवर्षी रु. ३,००० पेक्षा अधिक परंतु रु. ७,५०० पेक्षा अधिक नाही. | दुरुस्त्यांसाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मध्ये विहित केलेली कार्यपद्धती अनुसरण्यात यावी. |
| (पाच) स्थायी समिती. | वरीलप्रमाणे | प्रत्येक जीपसाठी दरवर्षी रु. ३,००० पेक्षा अधिक परंतु रु. ७,५०० पेक्षा अधिक नाही. | .. |

स्पष्टीकरण ८३.—गट विकास अधिकाऱ्याने ब्लॉक जीपच्याबाबतीत आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने किंवा जिल्हा परिषद जीपच्याबाबतीत त्याच्याकडून प्राधिकृत करण्यात येईल अशा इतर अधिकाऱ्याने पेट्रोल, तेल व संधारण आचार याव्रर करावयाच्या खर्चासाठी विहित केलेली मर्यादा दरमहा रु. ४५० एवढी होती ती १ जानेवारी १९७५ पासून (शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्रमांक जेईपी-१५७४-४२६१३-डी-एक, दिनांक १ जानेवारी १९७५) प्रत्येक जीप किंवा ॲम्बॅसेडर कार यांच्यासाठी दरमहा रु. ६०० पर्यंत वाढविण्यात आली होती. जिल्हा परिषदांनी हाती घेतलेली कामे किंवा योजना यांच्या संबंधातील वाढत्या कार्यक्रमांच्या अनुरोधाने जिल्हा परिषदेचे पदाधिकारी व अधिकारी यांना करावे लागणारे अधिक दौरे लक्षात घेऊन १ नोव्हेंबर १९७७ पासून (शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र. जेईपी-१५७६-सीआर-७६९-एकोणतीस, दिनांक ४ जुलै १९७७) ही कमाल मर्यादा परत दरवर्षी रु. १२,००० पर्यंत वाढविण्यात आली आहे. डीझेलवर चालणाऱ्या जीप व ॲम्बॅसेडर मोटारी यांच्याबाबतीत ही कमाल मर्यादा त्याच दिनांकापासून म्हणजेच १ नोव्हेंबर १९७७ पासून शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्रमांक जेईपी-१५७६-सीआर-७६९-एकोणतीस, दिनांक १५ नोव्हेंबर १९७७ आणि शासकीय शुद्धीपत्र क्रमांक जेईपी-१५७७-सीआर-११७४-एकोणतीस, दिनांक १८ फेब्रुवारी १९७८ दरवर्षी रु. ५,००० एवढी करण्यात आली आहे :

तथापि, जिल्हा परिषदांची साधनसंपत्ती राखून ठेवण्यासाठी आणि अशा खर्चावर पुरेसे आर्थिक नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने अधिनियमाच्या कलम २६१ (१) अन्वये, जिल्हा परिषदांना असे निदेश दिले आहेत की, कोणत्याही परिस्थितीत जीप व ॲम्बॅसेडर मोटारी यांच्या परिरक्षणावरील खर्च, म्हणजेच ब्लॉक जीप व जिल्हा परिषदेच्या जीप व ॲम्बॅसेडर मोटारी यांच्या बाबतीत पेट्रोल, तेल व संधारण आकार यांच्यावरील खर्च, त्यांच्यासाठी विहित करण्यात आलेल्या कमाल मर्यादेपेक्षा अधिक होता कामा नये किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी /स्थायी समिती यांना कमाल मर्यादेहून अधिक होणाऱ्या खर्चाला मंजुरी देता कामा नये. कमाल मर्यादेहून अधिक खर्च झाला असेल त्याबाबतीत विहित कमाल मर्यादेहून अधिक होणारा खर्च जीप किंवा ॲम्बॅसेडर मोटारी यांचा वापर करणाऱ्या व्यक्तीकडून वसूल करण्यात येईल. १९७५-७६ पासून हा निदेश अंमलात आला आहे. जिल्हा परिषदेचे पदाधिकारी/अधिकारी यांना मुख्यमंत्री/विगवेगळे मंत्री/राज्यमंत्री/मंत्रालयीन विभाग यांनी आमंत्रीत केलेल्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी मुंबई येथे किंवा इतर ठिकाणी हजर राहावे लागते हे पदाधिकारी/अधिकारी यांना विभागीय आयुक्त/शासनाचे विभागप्रमुख यांनी भरविलेल्या बैठकींनाही हजर राहावे लागते. अशा सर्व प्रकरणांमध्ये जिल्हा परिषदांचे पदाधिकारी/अधिकारी यांना जिल्ह्याबाहेर प्रवास करावा लागतो हे लक्षात घेता शासनाने असा निदेश दिला आहे की, काटकसरीच्या दृष्टीने जिल्हा परिषदेचे वाहन जिल्ह्याबाहेर नेणे हाच पर्याय ठरत असेल तर वर निर्दिष्ट केलेल्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी/अधिकाऱ्यांनी केलेल्या अशा प्रवासांवरील खर्च दरवर्षी रु. १,२०० किंवा यथास्थिती रु. ५,००० या कमाल मर्यादेच्या व्यतिरिक्त असेल, परंतु जिल्हा परिषदेच्या पुढाकाराने दौरे आयोजित करण्यात येत असतील त्याबाबतीत जिल्ह्याच्या बाहेरील अशा प्रवासांवरील खर्च हा विहित कमाल मर्यादेच्या आत असला पाहिजे. शासकीय परिपत्रक, ग्राम विकास विभाग क्रमांक जेईपी-५९६९-सीआर-२१७१-एकोणतीस, दिनांक ९ मार्च १९७९ अन्वये १ एप्रिल १९७८ पासून याची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

राज्य शासनाने विहित केलेल्या जिल्हा परिषदेच्या अशा प्राधिकाऱ्यांना विहित करण्यात येतील अशा विषयांच्या बाबतीत जिल्हा परिषदेला देय असलेली कराची किंवा शुल्काची किंवा इतर कोणतीही रक्कम मग ती या अधिनियमान्वये असो किंवा अन्यथा असो [1][वसुलीयोग्य नसलेली कोणतीही विहित रक्कम धरून] राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशा मर्यादेपर्यंत निलखित करण्यात येण्यासंबंधात निदेश देता येईल.

---

१. १९६४ चा महाराष्ट्र ४३ याच्या कलम २१ अन्वये हा कंस व मजकूर समाविष्ट करण्यात आला.

शामुना—ए-१३७९—उसमशाग्राविविमुं—६-९२—१०,५६५—पीसी-४*.